**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 08.10.2023** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **जीएसटी परिषदेच्या बैठकीत भरड धान्य आणि मोलॅसिस संदर्भात महत्त्वाचे निर्णय**
- **भारतीय वायु दलाचा आज 91 वा वर्धापन दिन.**
- **हमास या पॅलेस्टिनी दहशतवादी संघटनेनं इस्रायलवर केलेल्या हल्ल्यांमध्ये. तीनशेहून अधिक लोक ठार आणि दीड हजारहून अधिक लोक जखमी**

**आणि**

- **आशियाई क्रीडा स्पर्धांचा आज समारोप, भारताने 100 पेक्षा जास्त पदके मिळवत केली ऐतिहासिक कामगिरी.**

**जीएसटी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं झालेल्या 52 वी वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी परिषद पार पडली. यामध्ये भरड धान्य आणि मोलॅसिस यांवरील जीएसटी दर तसंच जीएसटी अपिलीय न्यायाधिकरण याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली. या निर्णयांनुसार मोलॅसिसवरील जीएसटी 28 टक्क्यांवरून 5 टक्के करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. तसंच 70 टक्के भरड धान्याचा समावेश असलेल्या सुट्या पिठाच्या विक्रीवर जीएसटी न आकारण्याचा निर्णयही जीएसटी परिषदेनं घेतला आहे. मात्र अशाच पिठाच्या लेबलसह पॅकबंद स्वरुपातील विक्रीवर 5 टक्के जीएसटी आकारण्यात येईल, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांच्यासह राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थ मंत्री जीएसटी परिषदेच्या बैठकीत सहभागी झाले होते.

**जीएसटी**

जीएसटी परिषदेच्या बावन्नाव्या परिषदेत करदात्यांना यावर्षी मार्चअखेर कर अधिकाऱ्यांनी दिलेल्या मागणी आदेशावर पुढील वर्षी ३१ जानेवारीपर्यंत अपील दाखल करण्याची सवलत काल देण्यात आली. जीएसटी कायद्यानुसार मागणी आदेशानंतर तीन महिन्याच्या आत करदात्याने अपील दाखल करायचे असते. ही मुदत वाढवल्यामुळं अनेक करदात्यांची सुविधा होणार आहे. तात्पुरत्या स्वरुपात मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर एक वर्षानंतर ती मुक्त करण्याची तरतूदही कालच्या बैठकीत करण्यात आली. जीएसटी भरला नाही तर बँक खात्यांसह मालमत्ता तात्पुरती ताब्यात घेण्याचा अधिकार कर अधिकाऱ्यांना दिलेला आहे.

**वायु दल**

भारतीय वायु दलाचा आज 91 वा वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्त बामरौली इथल्या वायु दलाच्या तळावर विशेष संचलनाचं तसंच उत्तरप्रदेशमधल्या प्रयागराज इथल्या संगम भागात विमानांच्या प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं आहे. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल  या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त वायु दल प्रमुख  एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी  यांनी दिलेल्या खास संदेशात, प्रशिक्षण पूर्ण केलेली अग्निवीरांची पहिली तुकडी येत्या जूनमध्ये सेवेत दाखल होणार असल्याचं  सांगितलं. वायु दलात स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला जात असल्याचंही त्यांनी नमूद केलं. तसंच नव्या बोध चिन्हाचेही अनावरण होत आहे.

**सिक्कीम**

केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांनी काल सिक्कीममधल्या तिस्ता नदीला आलेल्या पुराच्या आपत्ती संदर्भात  गंगटोक इथं राज्याचे मुख्य सचिव, आणि विविध विभागांची तसंच लष्कर, आणि इतर संघटनांच्या अधिकाऱ्यांची ताशिलिंग सचिवालयात बैठक घेतली. केंद्र सरकारचं सिक्कीममधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून राज्यासाठी आवश्यक ती सर्व मदत दिली जात आहे, पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री सिक्कीमच्या मुख्यमंत्र्यांच्या सतत संपर्कात आहेत, असं मिश्रा यांनी बैठकीला संबोधित करताना सांगितलं. तत्पूर्वी, सिक्कीमचे मुख्य सचिव व्हीबी पाठक यांनी मिश्रा यांना आपत्तीमुळे झालेलं नुकसान आणि मदत कार्याची माहिती दिली.
दरम्यान, या आपत्तीत मरण पावलेल्यांची संख्या आता 30 झाली आहे. यामध्ये भारतीय लष्कराच्या 9 जणांच्या समावेश आहे. काही जण अद्याप बेपत्ता आहेत. या पूरस्थितीची पाहणी करण्यासाठी आंतर मंत्री समिती सिक्कीमचा दौरा करणार आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**इस्रायल-हमास**

पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमासनं केलेल्या हल्ल्यांमध्ये तीनशेहून अधिक लोक ठार आणि दीड हजारहून अधिक लोक जखमी झाल्यानंतर इस्रायली संरक्षण दलांनी स्वोर्ड्स ऑफ आयर्न मोहीम सुरु केली आहे. गाझा पट्टीतील हमासच्या ताब्यातील १७ लष्करी कुंपण आणि चार केंद्रांवर इस्रायलनं हल्ला करुन २३० हून अधिक लोकांना ठार केलं. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यानी हमासविरुद्ध युद्धाची घोषणा केली आहे. हमासनं गाझामध्ये अनेक इस्रायली लोकांना पकडून ओलिस ठेवलं आहे. हमासनं केलेल्या अग्नीबाणांच्या हल्ल्यांमध्ये तेल अविव, रेहोवोत, गेदेरा आणि अशकेलोन यासह अनेक शहरांना लक्ष्य बनवलं. यानंतर अनेक हमास दहशतवाद्यांनी गाझा पट्टीतून इस्रायलमध्ये प्रवेश केला आणि शहरं ताब्यात घेतली. हमासचा लष्करी कमांडर मुहम्मद अल-दैफ यानं या मोहिमेला अल-अक्सा स्टॉर्म असं नाव दिलं असून इस्रायलनं महिलावरील हल्ले तसंच काही धार्मिक स्थळांना कथितपणे भ्रष्ट करणं तसंच गाझाला टाकलेला वेढा यांच्या विरोधात हे हल्ले असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हमास दहशतवाद्यांद्वारे इस्रायलवर झालेल्या हल्ल्याचा निषेध केला आहे आणि इस्रायलला पाठिंबा व्यक्त केला आहे. या हल्ल्यानंतर पॅलेस्टीनमधील भारतीय प्रतिनिधी कार्यालयानं रामल्ला इथल्या भारतियांना आपत्कालीन स्थितीत थेट संपर्क करण्याचं आवाहन केलं आहे.

**भूकंप**

अफगाणिस्तानच्या पश्चिमेकडील इराणच्या सीमेजवळील भागात झालेल्या शक्तिशाली भूकंपात किमान 120 जण ठार तर 1,000 जण जखमी झाले आहेत. स्थानिक वेळेनुसार सकाळी अकरा वाजता पश्चिमेकडील हेरात शहरापासून 40 किमी अंतरावर सहा पूर्णांक तीन रिख्टर क्षमतेचा हा भूकंपाचा धक्का बसला त्यापाठोपाठ आणखी तीनवेळा जोरदार हादरे बसले. यामध्ये अनेक इमारतींचं नुकसान झालं, असून अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.

**गगनयान**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं गगनयान चाचणीची तयारी सुरू केली असून लवकरच या चाचण्या घेण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती इस्रोनं समाज माध्यमांद्वारे दिली आहे. 2024 पर्यंत अंतराळात मानवरहित यान तसंच मानवांना अंतराळात पाठवण्याच्या उद्देशानं यानातील अवकाशवीरांच्या सुटका व्यवस्थेची कार्यक्षमता तपासून पाहणं हा या चाचण्यांचा मुख्य उद्देश आहे. या चाचणीमध्ये बाह्य अवकाशात कक्षीय वाहनाला वायुमंडलातून पुन्हा पृथ्वीवर परत आणून बंगालच्या उपसागरात उतरवलं जाणार आहे. भारतीय नौदलाच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी सराव सुरू केला असून या चाचणीच्या यशामुळे पहिल्या मानवरहित गगनयान मोहिमेचा टप्पा निश्चित होईल आणि शेवटी पृथ्वीच्या कमी कक्षेत बाह्य अवकाशात मानवयुक्त मोहिमेचा मार्ग निश्चित होण्यास मदत होणार आहे. तीन अंतराळवीरांसह हे कक्षीय वाहन पृथ्वीभोवती सुमारे 400 किलोमीटरच्या वर्तुळाकार कक्षेत तीन दिवस ठेवून पुन्हा पृथ्वीवर सुरक्षितपणे परत आणलं जाणार आहे. निवडलेले चार अंतराळवीर बेंगळुरू इथले अंतराळवीर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत.

**धर्मेंद्र प्रधान**

आगामी काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अव्वल स्थानावर येणार आहेच पण त्यावेळी त्यातील गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचं मोठं आव्हान युवकांसमोर राहणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यानी काल पुण्यात केलं. पुण्यातील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या 29 व्या वार्षिक दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुणे हे शिक्षण आणि सामाजिक सुधारणेचं प्रमुख केंद्र राहिलं असून देशाच्या आर्थिक विकासाच्या आरखड्यात या गोखले अर्थशास्त्र संस्थेचं योगदान फार मोलाचं राहिले आहे असे गौरवोद्गार प्रधान यांनी काढले. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या वतीने पुण्यातील विमाननगर भागात उभारण्यात आलेल्या 'ईशान्य भवन' या वास्तूचं उद्घाटन धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते करण्यात आलं.

**आशियाई खेळ**

चीनमधील हांगचौ आशियाई खेळांमध्ये, भारतीय खेळाडूंनी "इस बार 100 पार" च्या वचनबद्धतेनुसार आपली मोहीम पूर्ण केली आणि 28 सुवर्ण, 38 रौप्य आणि 41 कास्यअशी 107 पदकांची विक्रमी कामगिरी केली. 2018 मधील जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेतभारतीय खेळाडूंना एकंदर 70 पदक मिळाली होती. ऑलिम्पिक्स, राष्ट्रकुल आणि आशियाई खेळ या तीन प्रमुख खेळांपैकी कोणत्याही स्पर्धेत भारतानं 100 हून अधिक पदके जिंकण्याची ही दुसरी वेळ आहे. 2010 मध्ये नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धांध्ये त्यांनी 101 पदकं जिंकली होती. भारताच्या पदक स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी एकंदर 12 पदकं जिंकली, त्यापैकी निम्मी सुवर्णपदके कबड्डी, बॅडमिंटन, हॉकी आणि तिरंदाजी या क्रीडा स्पर्धांमध्ये आहेत. भारतीय खेळाडू आणि नेमबाज हे आशियाई क्रीडा

स्पर्धेत सर्वात यशस्वी ठरले. ॲथलेटिक्सने भारताला सर्वाधिक २९ पदकं मिळवून दिली. दुसरीकडे, भारतीय नेमबाजांनीदेशासाठी एकंदर 22 पदकं जिंकून दिली. आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकं जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे.  या स्पर्धेचा समारोप भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणार आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**